# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग


१३/८/२४
४:१०

दिनांक : १३/०८/२०२४

# प्रेसनोट

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडून सणांचे पर्यावरणपुरक साजरीकरण करणेच्या अनुषंगाने नागरीकांमध्ये जनजागृती करण्याबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत. त्या अनुषंगाने मा. आयुक्त तथा प्रशासक. डॉ. अजीज शेख, अतिरिक्त आयुक्त, जमीर लेंगरेकर तसेच उपायुक्त, डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार श्रीम. विशाखा सावंत, पर्यावरण विभागप्रमुख यांनी उल्हासनगर महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांकरीता मातीपासुन गणेश मुर्ती तयार करण्याच्या कार्यशाळेचे दिनांक १३ ऑगस्ट, २०२४ रोजी मिटटाऊन हॉल, गोल मैदान, उल्हासनगर-१ येथे आयोजन केले होते.

केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्लास्टर ऑफ पॅरीस च्या मुर्त्यांवर बंदी घालण्यात आलेली आहे. प्लास्टर ऑफ पॅरीसच्या मुर्त्यांचे जलाशयात विसर्जन केल्यानंतर सदर मुर्त्यांचे पाण्यात विघटन होत नाही. तसेच सदर मुर्त्यांवर रंगरंगोटीसाठी वापरलेल्या रासायनिक रंगामुळे पाणी प्रदुषित होवुन जलाशयातील जलचरांचे जीवन धोक्यात येते. याकरीता नागरीकांनी मातीपासुन किंवा पर्यावरणपुरक साहित्यापासुन तयार केलेल्या व लहान आकाराच्या मुर्त्यांचा वापर करावा याबाबत जनजागृती करणेसाठी सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

महापालिकेच्या शाळांमधुन सुमारे १५० विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी सदर उपक्रमाद्वारे तयार केलेली गणेश मुर्ती त्यांच्यासोबत घेऊन गेले. सदर गणेश मुर्ती विद्यार्थी आपल्या शाळांमधील इतर विद्यार्थ्यांना तसेच आपले शेजारी/ नातेवाईक इत्यादींना दाखवतील. यामुळे मोठया प्रमाणात मातीपासुन तयार केलेल्या मुर्तीची प्रतिष्ठापना करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

सदर कार्यशाळेमध्ये जनसंपर्क अधिकारी, श्रीम. छाया डांगळे तसेच पर्यावरण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

१३/८

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
   - सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.